# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.12.2025** **वारःसोमवार**

---

- २८८ नगरपरिषदा आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांत महायुतीला मोठं यश तर महाआघाडी पुन्हा अपयशी.

- व्हॉट्सअ‍ॅपवरील खाती हॅक करण्यासाठी 'घोस्ट पेअरिंग' नावाच्या सायबर मोहिमेचा वापर – सतर्क राहण्याचा इलेक्ट्रॉनिक्स मंत्रालयाचा इशारा.

- रेल्वेकडून प्रवासभाडे आकारणीतील बदल २६ डिसेंबरपासून लागू होणार.

- पुणे पुस्तक महोत्सवाची सांगता.

आणि

- 19 वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात भारताचा पाकिस्तानकडून पराभव.

**<u>निवडणूक निकाल</u>**

राज्यातल्या २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांचे निकाल काल जाहीर करण्यात आले.

या निवडणुकीत भाजपा 117 जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष राहिला तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षानं 53 आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षानं 37 जागा जिंकल्या आहेत. कॉंग्रेसला 28, शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला 7, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 9 जागा मिळाल्या तर अपक्ष आणि इतरांना 37 जागा मिळाल्या आहेत.

तीन नगराध्यक्ष पदांसाठीच्या निवडणूका याआधीच बिनविरोध झाल्या होत्या. या निवडणुकीत स्थानिक पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वेगवेगळ्या तडजोडी झाल्या होत्या तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या.

कोल्हापूर जिल्ह्यात नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीत मतदारांनी स्थानिक आघाड्यांना पसंती दिली आहे.

सांगलीत आटपाडी आणि जत मध्ये भाजपाचे शिराळा इथं तर शिवसेनेचे उमेदवार विटा इथं नगराध्यक्षपदी निवडून आले. तर इश्वरपूर इथं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, आष्ट्यात स्थानिक आघाडी, पलूसमध्ये काँग्रेस आणि तासगाव इथं स्वाभिमानी आघाडीचे उमेदवार निवडून आले.

सातारा जिल्ह्यात १० पैकी सात पालिकांत भाजपचे, दोन ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तर कराड इथं शिवसेना पुरस्कृत उमेदवारानं नगराध्यक्षपद मिळवले.

अहिल्यानगरमध्ये राहाता, देवळाली प्रवरा, पाथर्डी, शिर्डी, श्रीगोंदा, जामखेड, कोपरगावमध्ये भाजपानं नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकली. संगमनेरच्या नगराध्यक्षपदी शहर विकास आघाडीच्या डॉक्टर मैथिली तांबे विजयी झाल्या. श्रीरामपूरमध्ये काँग्रेस, तर शेवगाव आणि नेवासा इथं शिवसेनेच्या उमेदवारांनी बाजी मारली.

अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्षपदी भाजपानं विजय मिळवला. तर नगरसेवक पदांवर शिंदेसेनेचं वर्चस्व राहिलं आहे. काँग्रेसनं १२ जागा जिंकल्या.

**<u>पुणे निकाल</u>**

पुणे जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निकालांमध्ये जिल्ह्यातील 17 पैकी 10 ठिकाणी नगराध्यक्षपद अजित पवार गटाकडे गेलं आहे. लोणावळा, दौंड, इंदापूर, जेजुरी, बारामती आणि फुरसुंगी या नगरपरिषदांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानं सत्ता मिळवली आहे. तळेगाव आणि शिरूर इथं बहुमत भाजपला असलं तरी नगराध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे गेलं आहे. चाकण, जुन्नर आणि राजगुरुनगर इथं शिवसेना एकनाथ शिंदे गटाचा विजय झाला आहे. सासवड आणि आळंदी इथं भाजपनं सत्ता मिळवली असून भोर नगरपरिषदेत बहुमत भाजपचे असले तरी नगराध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे गेलं आहे. नगरपंचायतींत वडगाव मावळ आणि माळेगाव इथं राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा विजय झाला आहे, तर मंचर नगरपंचायतीत शिवसेना एकनाथ शिंदे गटानं बाजी मारली आहे.

दरम्यान जेजूरी नगरपरिषदेच्या निकालानंतर गुलालची उधळण आणि फटाके फोडताना आगीचा भडका उडाल्यानंतर 16 जण भाजल्याची घटना घडली आहे.

**चव्हाण**

या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला दणदणीत यश देऊन मतदारांनी विकास, सेवा, सुशासनला कौल दिला आहे. 125 पेक्षा अधिक जागांवर भाजपाचा विजय तसंच 1100 पेक्षा अधिक नगरसेवक निवडून दिले आहेत. भाजपावर मोठा विश्वास दाखविल्याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी जनतेचे आभार मानले आहेत. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या विजयोत्सवावेळी ते बोलत होते. भाजपा आणि महायुतीचा विजय म्हणजे लोकांनी विकास कामाला दिलेली पावती असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

या यशामुळं राष्ट्रवादीच्या विकासात्मक, सर्वधर्मसमभावाच्या भूमिकेवर जनतेचे शिक्कामोर्तब झाल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनतेचे आभार मानताना म्हटलं आहे.

निवडणुकीत मतदारांनी विकासाला पसंती दिली असून आपल्या पक्षाची हीच कामगिरी महानगरपालिकांच्या निवडणुकीत पाहायला मिळेल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निकालाच्या पार्श्वभूमीवर व्यक्त केला आहे.

तर या निवडणुकीत मतदार प्रक्रियेचा गोंधळ घातला गेला तसंच ही निवडणूक मुक्त आणि निर्भय वातावरणात झाली नसल्याची टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**इंट्रो-व्हॉट्सअॅप**

व्हॉट्सअॅपवरील खाती हॅक करण्यासाठी 'घोस्ट पेअरिंग' नावाच्या सायबर मोहिमेचा वापर केला जात असल्याचा इशारा इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं दिला आहे. याबाबत अधिक माहिती देणारा हा वृत्तांत...

***स्क्रीप्ट-***

*सायबर गुन्हेगार किंवा हॅकर्स प्रमाणीकरणाची आवश्यकता नसलेल्या पेअरिंग कोडचा वापर करून खाती हॅक करण्यासाठी व्हॉट्सअॅपच्या डिव्हाइस-लिंकिंग वैशिष्ट्याचा गैरफायदा घेत आहेत. वापरकर्त्याला त्याच्या विश्वासू संपर्काकडून 'हाय, हा फोटो पाहा' असा संदेश येतो. या संदेशात फेसबुकसारखी प्रिव्ह्यू करण्यासाठी एक लिंक असते, त्यावर क्लिक केलं की फोन क्रमांकाद्वारे पडताळणी प्रक्रियेकडं घेऊन जाते. याद्वारे हल्लेखोरांना कोणताही पासवर्ड*

*न चोरता किंवा सिम अदलाबदल न करता संबंधित व्हॉट्सअ‍ॅप खात्यांवर पूर्ण नियंत्रण मिळतं आणि ही साखळी पुढे चालू राहते. नागरिकांनी संशयास्पद लिंक्सवर क्लिक करु नये आणि बाहेरच्या साइट्सवर आपला फोन क्रमांक कधीही भरु नये. लोकांनी व्हॉट्सअ‍ॅपच्या लिंक केलेल्या डिव्हाइस सेटिंग्ज नियमितपणे तपासाव्या आणि अशा जाळ्यांपासून दूर राहावं असं मंत्रालयानं सांगितलं आहे.*

**<u>इंट्रो</u>**

दुसरा आंतरराष्ट्रीय ध्यान दिवस काल जगभरात ध्यानविषयक कार्यक्रमांच्या आयोजनाद्वारे साजरा करण्यात आला. मानवी शरीराच्या निरामय स्थितीसाठी ध्यानाचं महत्व ओळखून सयुक्त राष्ट्र महासभेनं गेल्या वर्षी २१ डिसेंबर हा दिवस ध्यानासाठी निश्चित केला होता. सर्वसामान्य लोकांसाठी ध्यान साधनेचं महत्व विशद करताना आयुर्वेदाचार्य डॉक्टर सुकुमार सरदेशमुख आकाशवाणीशी बोलताना म्हणाले ...

**<u>रेल्वेभाडे</u>**

रेल्वेने प्रवासभाडं आकारणीत बदल केले असून ते येत्या २६ डिसेंबरपासून लागू होणार आहेत. यात सर्वसामान्य वर्गाच्या प्रवास भाड्यात २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. त्यापुढच्या सामान्य वर्गाच्या प्रवासाकरता प्रति किलोमीटर एक पैसा तर मेल - एक्सप्रेस गाड्यांसाठी प्रति किलोमीटर २ पैसे भाडेवाढ झाली आहे. ५०० किलोमीटर अंतराच्या प्रवासाकरता १० रुपये जास्त मोजावे लागणार असून उपनगरी गाड्याच्या प्रवासभाड्यात बदल केलेला नाही असं रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. तर केंद्र सरकारनं २६ डिसेंबरपासून लागू केलेल्या रेल्वे प्रवासी भाड्यात वाढ केल्याचा काँग्रेस पक्षानं तीव्र निषेध केला आहे.

**<u>शुभांशू</u>**

'भारत २०४० मध्ये चंद्रावर उतरण्याची तयारी करत आहे. कदाचित तिथे पडणारं पहिले पाऊल तुमचं असू शकतं. सातत्यपूर्ण प्रयत्न, चिकाटी, निर्धार आणि कठोर परिश्रमातून हे स्वप्न सत्यात उतरवा,' असं प्रतिपादन अंतराळवीर आणि भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी काल पुण्यात केलं. शुभांशू शुक्ला यांनी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली.

या वेळी त्यांनी आपल्या अंतराळ मोहिमेचे रोमांचक अनुभव पुणेकरांसमोर मांडले.  भारतात नवीन अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत असून, भारतीय अंतराळवीरांना या केंद्रात प्रशिक्षित होता येणार असल्याची माहितीही शूभांशू शुक्ला यांनी यावेळी दिली.

पुणे पुस्तक महोत्सवाची काल सांगता झाली. लाखों जणांनी या पुस्तक महोत्सवाला भेट दिली असून कोट्यावधी रुपयांची उलाढाल नोंदवली गेली आहे.

**क्रिकेट19**

भारत आणि पाकिस्तानच्या १९ वर्षांखालील क्रिकेट संघांमध्ये दुबई इथं आशिया चषक स्पर्धेच्या  अंतिम सामन्यात भारताचा 191 धावांनी पराभव झाला. पाकिस्ताननं समीर मिन्हासच्या १७२ धावांच्या जोरावर भारतासमोर विजयासाठी ३४८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. प्रत्युत्तरादाखल भारतीय संघ केवळ 156 धावांपर्यंत मजल मारू शकला. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. भारताचा निम्मा संघ १० षटकांतच माघारी परतला होता.

**हवामान**-

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असून तुरळक ठिकाणी थंडीची लंत येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.